क्रांतिवीर, लोकनेते, पद्मभूषण,

# डॉ. वसंतरावदादा पाटील

रघुराज मेटकरी



क्रांतिवीर, लोकनेते, पद्मभूषण

# डॉ. वसंतरावदादा पाटील

रघुराज मेटकरी

तेजश्री
प्रकाशन

माझे लेखक मित्र

प्रा. डॉ. वामन जाधव

मा.ह.महाडिक महाविद्यालय, मोडनिंब

डॉ. किसन माने

विज्ञान महाविद्यालय, सांगोला

प्रा. मुकुंद वलेकर

माणदेश महाविद्यालय, जुनोनी

यांच्या मराठी भाषेवरील प्रेमास

# भाग एक

महाराष्ट्र भूमीची माती ही फार पवित्र माती आहे. या मातीत खूप रांगडेपणा आहे. उंच उंच डोंगर आहेत. खोल खोल दऱ्या आहेत. तसेच पथराच्या छातीची आणि डोंगराएवढ्या उंचीची माणसे इथे जन्माला आलेली आहेत. भारतभूमीसाठी या देशावरील इंग्रज सरकारची गुलामगिरी नाहीशी करण्यासाठी आयुष्यभर तुरुंगात सडणारे, गळ्याभोवती फास अडकवून फाशी जाणारे, देशासाठी पोलिसांच्या गोळ्या झेलणारे, देशासाठी तोफेच्या तोंडी जाणारे कितीतरी देशभक्त हे इथल्या मातीचे वैभव आहे. घरदार, बायको-मुले, संसार यावर तुळशीपत्र ठेवणारे, देशासाठी पागल होणारे, त्यांना मृत्यूची भीती वाटली नाही, स्वातंत्र्याच्या शोधासाठी सर्वस्वाचा त्याग करू इच्छिणारी ही माणसे किती मोठ्या मनाची, किती थोर होती.

'भारतमाता हीच आमुची आई, आम्ही धरतीची लेकरे, भूमातेची उपासना हाच आमचा धर्म, जननी-जन्मभूमी आम्हाला स्वर्गापेक्षा प्यारी आहे', असे विचार करणारे देशभक्त आम्हाला हे आजही भारतातील प्रत्येक माणसाचे दैवत आहेत. दैवत राहातील.

महाराष्ट्रभूमीचे असेच एक थोर पुरुष, या भूमीचे वैभव सहकार महर्षी वसंतदादा पाटील यांच्याविषयी आपण जाणून घेणार आहोत. वसंतदादा पाटील या महाराष्ट्रभूमीचे चार वेळा मुख्यमंत्री होते. त्यांनी लोकांच्यासाठी केलेले कार्य, देशाच्या स्वातंत्र्यासाठी पोलिसांच्या गोळीबारातून तुरुंग फोडून केलेले पलायन, तुरुंगाच्या चाळीस फूट उंच भिंतीवरून मारलेली उडी, छातीवर झेललेली गोळी सारेच अभूतपूर्व आहे.

वसंतदादा म्हणून भारतीय संस्कृतीचे प्रतीक होते. लोकांच्या सामाजिक जाणिवेची आणि उणिवांची काळजी घेणारे लोकांच्यासाठी अविरत धडपडणारे ते व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे जीवनचरित्र म्हणजे वाचकाला अंतर्मुख करणारे, आत्मनिर्भर करणारे, यशाची प्रेरणा देणारे, मनाला कणखर बनविणारे आणि या भूमीवर प्रेम